**अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९, सुधारीत अधिनियम, २०१५ अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरीता अहमदनगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथे प्रत्येकी एक याप्रमाणे ५ अनन्य विशेष न्यायालये (Exclusive Special Courts) स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:विशेन्या-१३१८/११०५/प्र.क्र.२२०/का-९**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-०६ ऑगस्ट, २०२६.

**संदर्भ:-** १) मा.उच्च न्यायालयाचे पत्र क्र.B(W)A-२१०६ of २०१०/२४९६/४००८६, दि.०३.१०.२०१८.

२) मा.उच्च न्यायालयाचे पत्र क्र.B(W)A-२१०६ of २०१०/३९०/४८०३, दि.११.०२.२०२२.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/४१/नाहसं-टे-नं.-२/अनन्यविशेष न्यायालय/२०१६-३१३,दि.२६.०९.२०२४.

४) मा.उच्च न्यायालयाचे पत्र क्र.B(W)A-२१०६ of २०१०/२४८१/५३३६९, दि.०८.११.२०२४.

५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.युटीए-२०११/प्र.क्र.३/ सुधार-१, दि.१७.११.२०११.

६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.युटीए-२०११/प्र.क्र.३/सुधार-१, दि.२०.११.२०१२.

७) विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.एचसीटी १२२२/८३८/प्र.क्र.१४३/का.३, दि.०६.०२.२०२४ व शासन निर्णय शुद्धिपत्रक, दि.१०.१०.२०२४.

८) मा.उच्च न्यायालयाचे पत्र क्र.B(W)A-२१०६ of २०१०/२४१८/४३८३९, दि.१८.१०.२०२५.

**प्रस्तावना :-**

अनुसुचित जाती/जमाती (अ.प्र.) अधिनियम, १९८९, सुधारीत अधिनियम, २०१५ अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरीता अहमदनगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथील न्यायदान कक्षाची उपलब्धता तसेच प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेऊन त्या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे ५ अनन्य विशेष न्यायालये (Exclusive Special Courts) स्थापन करण्याबाबत आणि त्याकरिता आवश्यक पदांना व खर्चास मान्यता देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने शिफारस केली आहे. विधि व न्याय विभागाच्या संदर्भाधीन क्र.४ येथील ०६.०२.२०२४

च्या शासन निर्णयान्वये राज्यात जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) या संवर्गातील न्यायिक अधिकाऱ्यांची अतिरिक्त नवीन २८६३ नियमित पदे, तसेच त्यांचेसाठी सहाय्यभूत कर्मचारीवृदांची ११०६४ नियमित पदे निर्माण करण्यास व ५८०३ मनुष्यबळाच्या मर्यादेत बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेण्यास संबंधित न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर अधिनियमांतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरीता अहमदनगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथे प्रत्येकी एक याप्रमाणे ५ अनन्य विशेष न्यायालये (Exclusive Special Courts) स्थापन करण्याची व त्यासाठी पदनिर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९, सुधारीत अधिनियम, २०१५ अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरीता अहमदनगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथे प्रत्येकी एक याप्रमाणे ५ अनन्य विशेष न्यायालये (Exclusive Special Courts) स्थापन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर ५ अनन्य विशेष न्यायालयांकरीता खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली पदे संदर्भाधीन क्र. ७ येथील दिनांक ०६.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या पदांमधून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**नियमित पदे (अस्थायी) व बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा)**

| अ. क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश | न्यायिक वेतनश्रेणी (J-५) १४४८४०-१९४६६० | १ |
| २ | लघुलेखक (ग्रेड-१) | ४७६००-१५११०० (S-१७) | १ |
| ३ | अधिक्षक | ४४९००-१४२४००(S-१६) | १ |
| ४ | वरिष्ठ लिपिक | २५५००-८११०० (S-८) | १ |
| ५ | कनिष्ठ लिपिक | १९९००-६३२०० (S-६) | २ |
| ६ | बेलिफ | १९९००-६३२०० (S-६) | १ |
| ७ | शिपाई (काल्पनिक पदे- बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा) | -- | २ |
| **एकूण (१ न्यायालयाकरीता)** | | | ९ |
| **एकूण (५ न्यायालयांकरीता)** | | | ४५ |

३. बाह्ययंत्रणेव्दारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दिनांक २७.०४.२०२२ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्याची दक्षता संबंधित जिल्हा व सत्र न्यायालयांनी घ्यावी.

४. सदर अस्थायी पदांना दिनांक २८.०२.२०२७ नंतर पुढील मुदतवाढ घेणे आवश्यक राहील.

५. यानुषंगाने येणाऱ्या रुपये रुपये ३,९९,३५,५२०/- (रुपये तीन कोटी नव्व्याण्णव लक्ष पस्तीस हजार पाचशे वीस फक्त) इतक्या वार्षिक आवर्ती व रु. ५१,६८,५००/- (रुपये एकावन्न लक्ष अडुसष्ट हजार पाचशे फक्त) इतका अनावर्ती खर्च याप्रमाणे एकूण रु.४,५१,०४,०२०/- (रुपये चार कोटी एकावन्न लक्ष चार हजार वीस फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

६. सदर न्यायालयाकरिता येणारा खर्च “मागणी क्र. जे-१, २०१४, न्यायदान-१०२-उच्च न्यायालय, १०२ (०९) (०१) न्यायालयाची दर्जावाढ व प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विशेष अनुदान- २०१४ ०३८८” या लेखाशिर्षाखाली निधी विहित पध्दतीने अर्थसंकल्पित करुन व तद्नंतर संबंधित वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौ. सं. क्र.४५५/सेवा-९, दि.२८.११.२०२३ व अनौ. सं. क्र.६६३/२०२५/व्यय-१०, दि.३०.१०.२०२५ अन्वये तसेच, मा. मंत्रिमंडळाच्या दि. २८.०७.२०२६ रोजीच्या बैठकीत झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०८०६१३१५१२००१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAGAR JAGDISH BONDRE

Digitally signed by SAGAR JAGDISH BONDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=758E680C096816E7BC8C5CFA4D68A0A2C4BF018A47792BA2218CFC8931BAFB94, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FBFC75851717C6A4821D7E342915AFB63273FFBA8DB7B62A81FFC78124ACD737, cn=SAGAR JAGDISH BONDRE
Date: 2026.08.06 13:16:05 +05'30'

**(सागर बोंद्रे)**
**उप विधी सल्लागार-नि-उप सचिव,**

**प्रतः**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री तथा मा. मंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री तथा मा. मंत्री (उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मा. महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई
९. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (निरीक्षणे-१), मुंबई.
११. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ.
१२. महालेखापाल- एक /दोन(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ.
१४.वित्त विभाग-व्यय-५/आपुक/सेवा-९.
१५.विधि व न्याय विभाग कार्यासन-२०, २३, २४ व २५.
१६. निवड नस्ती/का.९.